13 AUG 2018

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सांगलीतील युवकाच्या संशोधनाची मोदींकडून प्रशंसा

## महेश गोगटे यांचे वाराणसीतील जलप्रदूषणावर संशोधन : गंगा शुद्धीकरण प्रकल्पासाठी उपयुक्त

मानसिंगराव कुमठेकर
मिरज


सांगलीतील युवा संशोधक महेश माधव गोगटे यांनी वाराणसीतील विविध जलाशय आणि नद्यांमधील जलप्रदूषणावर केलेल्या संशोधन प्रकल्पाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली असून, हा प्रकल्प गंगा शुद्धीकरण प्रकल्पासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महेश गोगटे यांनी जपान येथील क्योटो विद्यापीठात संशोधक म्हणून कार्य केले आहे.

महेश गोगटे यांनी वाराणसीतील अत्याधिक प्रदूषित जलाशयांवर सलग तीन वर्षे अभ्यास करुन हे प्रदूषण कसे दूर करता येईल, याबाबत काही निष्कर्ष आणि सूचना आपल्या संशोधनातून मांडल्या आहेत. सावित्रीबाई फुले विद्यापीठातील विदेशी भाषा संस्थेच्या जपानी भाषा विभागात ते कार्यरत आहेत. गोगटे हे मूळचे सांगली येथील आहेत. बँकिंग विषयातील तज्ज्ञ डॉ. माधव गोगटे यांचे ते सुपुत्र आहेत. गोगटे यांनी जपानमधील क्योटो विद्यापीठात आशियान आणि आफ्रिकन स्टडीज् विभागात विद्यार्थी संशोधक म्हणून काम केले आहे. या विभागात अभ्यास करताना त्यांनी भारतातील जलप्रदूषणाचा विषय निवडला होता.

त्यासाठी वाराणसीतील कुंडा, पोखारा आणि पुष्करणी या सर्वाधिक प्रदूषित जलाशयांची निवड अभ्यास विषय म्हणून केली होती.सलग तीन वर्षे केलेल्या या अभ्यासातून त्यांनी 'द इकॉलॉजीकल ॲण्ड हेरिटेज कन्झर्व्हेशन ऑफ एन्शीएन्ट वॉटर बॉडीज्" या विषयात प्रबंध त्यांनी जपान विद्यापीठात सादर केला. त्यांच्या या संशोधनाला अभ्यासकांनी मान्यता दिली. नुकतेच महेश गोगटे यांनी वाराणसीतील जलप्रदूषणावर केलेले आपले महत्त्वपूर्ण संशोधन आणि त्यातील निष्कर्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर केले. ही भेट म्हणजे एक यादगार क्षण होता, असे महेश गोगटे म्हणाले. यावेळी त्यांनी जलप्रदूषणाच्या कारणांची आणि त्यातून मी काढलेल्या निष्कर्षाची माहिती पंतप्रधानांनी करुन घेतली. हे संशोधन गंगाजल शुद्धिकरणाच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सांगलीच्या युवकाने केलेल्या या संशोधनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाठिंबा दिला असून, यापुढील संशोधनासाठी प्रोत्साहन दिले आहे.

### जल प्रदूषणाचा सखोल अभ्यास

सन १७९४ ते १९४७ या वसाहतवादाच्या काळात या जलाशयांमध्ये कोणकोणते बदल झाले, याचा अभ्यास त्यांनी केला होता. भारतातील सर्वाधिक प्राचीन शहर असणाऱ्या आणि गंगा नदीच्या पवित्र किनाऱ्यावरील सांस्कृतिक आणि धार्मिक व्यासपीठ असलेले वाराणसी हे पवित्र जलाशयांसाठी प्रसिद्ध आहे. हे सर्व जलाशय गंगा नदी आणि अन्य दोन उपनद्यांना जोडलेले आहेत. याच जलाशयांच्या प्रदूषणाचा अभ्यास गोगटे यांनी केला आहे.



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जलशुद्धीकरणावरील संशोधन सादर करताना महेश गोगटे.

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयात कार्यशाळा

**गगनबावडा : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालय गगनबावडा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाचा चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टिम (C.B.C.S) नुसार बी. कॉम. भाग १ च्या विमाशास्त्र विषयाच्या बदललेल्या अभ्यासक्रमाकरिता एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



**गगनबावडा : कार्यशाळेचा प्रारंभ रोपाला पाणी घालून करताना प्रा. डॉ. एन. व्ही. शहा आदी.**

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा होते. त्यांनी आपल्या बिजभाषणामध्ये विमाशास्त्रातील अनेक नवसंकल्पना समजावून सांगितल्या. कार्यशाळेसाठी डॉ. एस. आर. पोवार, ए. एस. बन्ने, प्रा. बी. व्ही. वळगड्डे , डॉ. एन. एम. मुजावर (व्यंकटेश कॉलेज, इचलकरंजी) आदी उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना विमाशास्त्र अभ्यासक्रमातील बदला संबंधी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठ परिसरातील प्राध्यापक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. सतीश देसाई व सचिव प्रा. डॉ. विद्या देसाई यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. एस. एस. पानारी यांनी तर वक्ते परिचय व आभार प्रा. आदिनाथ कांबळे यांनी केले.